महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
**कार्यालय, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर, महाराष्ट्र राज्य**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्रं. ०७१२-२९५९३८१ CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/नागपूर/आस्था/जाहिरात/२०२५/२९२५ दि.०९.१०.२०२५

## -: जाहीरात :-

महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) ही कंपनी ॲक्ट २०१३ खाली स्थापन झालेली स्वायत्त संस्था नागपूर येथे कार्यरत आहे. उद्योजकता विकास प्रशिक्षणाअंतर्गत लोकांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी स्वतःचा रोजगार निर्माण करून इतरांनाही रोजगार देणे याकरिता उद्योजकता विकास प्रशिक्षण राबविण्यात येणार आहे. याकरिता अनुभवी व पात्र उमेदवारांची “उद्योजकता विकास सल्लागार” या पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | “उद्योजकता विकास सल्लागार” | १ | व्यवस्थापन (Management) / उद्योजकता विकास या विषयांत पीएच.डी असणे अनिवार्य राहील. | उद्योजकता विकास प्रशिक्षण राबविल्याचा शासकीय/निमशासकीय/विद्यापीठस्तरावर कामाचा किमान ३० वर्ष अनुभव. |

अर्जदारांकरीता अर्ज सादर करण्याचा नमुना महाज्योतीच्या www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावरील Notice Board या “उद्योजकता विकास सल्लागार” या लिंक वर उपलब्ध करण्यात आलेला आहे. इच्छुक उमेदवारांनी अर्ज **दि.२४.१०.२०२५** पर्यंत सर्व आवश्यक कागदपत्रांसहीत महाज्योतीच्या खालील नमुद पत्त्यावर कार्यालयीन वेळ संपेपर्यंत सादर करण्यात यावा.

प्राप्त अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी त्यांनी दिलेल्या ईमेलवर कळविण्यात येईल. निवडसमितीने निवडीसाठी शिफारस केलेल्या उमेदवारांना तसे त्यांच्या ईमेलवर कळविण्यात येईल तसेच निवडसमितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

**नोट :** अर्ज पोस्टाने रजिस्टर किंवा कुरिअरव्दारे कार्यालयास सादर करावे.
ई-मेलव्दारे सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**अर्ज सादर करण्याकरिता पत्ता :-** महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, ए-विंग, शासकीय औद्योगिक संस्था (ITI) समोर, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंदपेठ, नागपूर ४४००२२.

-स्वा.-
(मिलिंद नारिंगे)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

# -: जाहीरातीचा तपशील :-

## अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक :- २४.१०.२०२५ कार्यालयीन वेळ संपेपर्यंत.

**पदनाम : "उद्योजकता विकास सल्लागार"**
**पद संख्या : १**
**कामाचे स्वरुप :**

प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण (Training Need Assessment) :-

- स्थानिक तरुण व महिलांच्या उद्योजकतेसाठी आवश्यक कौशल्ये व प्रशिक्षण गरजा ओळखणे.

प्रशिक्षण कार्यक्रमाची आखणी :-

- उद्योग, व्यवसाय व स्वयंरोजगाराशी संबंधित अभ्यासक्रम, कार्यशाळा व उपक्रम तयार करणे.

प्रशिक्षकांचे मार्गदर्शन :-

- प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षकांना आवश्यक मार्गदर्शन व सामग्री उपलब्ध करून देणे.

प्रशिक्षण साहित्य निर्मिती :-

- उद्योजकता विकासासाठी पुस्तिका, मॉड्यूल्स, प्रेझेंटेशन, व्हिडीओ इत्यादी साहित्य तयार करणे.

प्रशिक्षणाचे आयोजन :-

- वेळापत्रक ठरवून प्रत्यक्ष/ऑनलाईन पद्धतीने प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करणे.

सहभागींचे मार्गदर्शन :-

- प्रशिक्षणार्थींना व्यवसाय कल्पना विकसित करणे, प्रकल्प अहवाल तयार करणे व निधी मिळवण्यासाठी मदत करणे.

शासकीय योजनांची माहिती :-

- विविध शासकीय व बँकिंग योजनांबद्दल मार्गदर्शन करून लाभ मिळवून देणे.

नेटवर्किंग व उद्योगजगताशी संपर्क :-

- स्थानिक उद्योग, व्यापारी संघटना व बँकांशी समन्वय साधून प्रशिक्षितांना संधी उपलब्ध करून देणे.

प्रशिक्षण परिणाम मोजणी :-

- प्रशिक्षणानंतरचा अभिप्राय गोळा करून यशाचे प्रमाण व सुधारणा करण्याच्या गरजा नोंदवणे.

प्रगती अहवाल सादर करणे :-

- संस्थेला नियमितपणे प्रशिक्षण उपक्रमांचा अहवाल, सहभागींची प्रगती व यशोगाथा सादर करणे.

**निवड प्रक्रिया व नियुक्ती :-**

१) पात्र उमेदवाराची करारपध्दतीने ११ महिन्याकरिता निवड केली जाईल.

२) बंधपत्र / हमीपत्र :- करार पध्दतीने नियुक्ती आदेश प्राप्त झालेनंतर नियुक्ती आदेश अनुषंगाने बंधपत्र/हमीपत्र नोटरी करून कार्यालयास सादर करावे.

३) करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने या निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा, तसेच करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्कांची मागणी करण्यात येणार नाही.

४) प्राप्त अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी त्यांनी दिलेल्या ईमेलवर कळविण्यात येईल.

५) निवडसमितीने निवडीसाठी शिफारस केलेल्या उमेदवारांना तसे त्यांच्या ईमेलवर कळविण्यात येईल तसेच निवडसमितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

अर्हता व अनुभव :-

१) व्यवस्थापन (Management)/ उद्योजकता विकास या विषयांत पीएच.डी असणे अनिवार्य राहील.
२) उद्योजकता विकास प्रशिक्षण राबविल्याचा शासकीय/निमशासकीय/विद्यापीठस्तरावर कामाचा किमान ३० वर्ष अनुभव.

इतर अटी व शर्ती :-

१) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाने/ सामावुन घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

२) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

३) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

४) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

५) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत. (उदा. आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकार देता येणार नाहीत.)

अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-

- भरलेला अर्ज
- C.V (Biodata)
- आधार कार्ड व PAN कार्ड
- शैक्षणिक कागदपत्रे
- कामाचे अनुभव प्रमाणपत्र
- संगणक किंवा अन्य आवश्यक कौशल्य प्रमाणपत्र (असल्यास)
- फोटो - २ प्रती

**नोट :** अर्ज पोस्टाने रजिस्टर किंवा कुरिअरव्दारे कार्यालयास सादर करावे.
ई-मेलव्दारे सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**अर्ज सादर करण्याकरिता पत्ता :-** महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, ए-विंग, शासकीय औद्योगिक संस्था (ITI) समोर, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंदपेठ, नागपूर ४४००२२.

.

-स्वा.-
(मिलिंद नारिंगे)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर